महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे

७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०

संपर्क क्रमांक (०२०) २४४७ ६९३८ E-mail: evaluationdept@maa.ac.in

जा.क्र. राशैसंप्रपम/ मूल्यमापन/सं. मू.चा.-१ -VSK/२०२४-२५/ 05409 दि. ११ नोव्हेंबर २०२४

प्रति,

१) शिक्षणाधिकारी ( प्राथमिक/माध्यमिक) जि.प. (सर्व)

२) शिक्षणाधिकारी,बृहन्मुंबई,मनपा,( सर्व )

३) शिक्षण निरीक्षक,मुंबई (उत्तर, दक्षिण, पश्चिम )

४) प्रशासन अधिकारी,म.न.पा./न.पा./न.प.(सर्व)

विषय : संकलित मूल्यमापन चाचणी-१ (PAT -२ ) (महाराष्ट्र) या चाटबॉटवर गुण नोंदविणेबाबत.... .....

संदर्भ : १. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. राशैसंप्रपम/मूल्यमापन/सं.चा.जिल्हा पत्र /२०२४-२५/०४५०२,दि.२४ सप्टेंबर २०२४.

उपरोक्त विषयान्वये STARS प्रकल्पामधील SIG-२ Improved Learning Assessment System **नुसार** सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता तिसरी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी **नियतकालिक मूल्यांकन** (PAT)अंतर्गत पायाभूत चाचणी, संकलित मूल्यमापन १ व संकलित मूल्यमापन २( PAT-१ ते ३ )चे आयोजन करण्यात येणार आहे. उपरोक्त संदर्भानुसार राज्यात **संकलित मूल्यमापन चाचणी-१** (PAT -२ ) चे आयोजन दि. २२ ते २५ जुलै २०२४ या कालावधीत शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खाजगी अनुदानित शाळामध्ये करण्यात आलेले होते. प्रथम भाषा (सर्व माध्यम), गणित (सर्व माध्यम), तृतीय भाषा- इंग्रजी या विषयांचे संकलित **मूल्यमापन चाचणी-१** (PAT -२ ) घेण्यात आलेली आहे. सदर संकलित मूल्यमापन चाचणी-१ (PAT -२ ) शिक्षकांनी तपासणेबाबत सूचित करण्यात आलेले होते. तसेच सदर मूल्यमापनाचे गुण विद्या समीक्षा केंद्र (VSK) यांचेमार्फत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या पोर्टलवर भरायचे असून याबाबतच्या सविस्तर सूचना यापूर्वी यु-ट्युबद्वारे देण्यात आलेल्या आहेत.

विद्या समीक्षा केंद्र (VSK), पुणे यांचेमार्फत PAT (महाराष्ट्र) हा चाटबॉट संकलित मूल्यमापन चाचणी-१(PAT -२ )गुण भरण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. यावर संकलित मूल्यमापन चाचणी-१ (PAT -२ )शिक्षकांनी नोंदविणे आवश्यक आहे. सदर चाटबॉटवर संकलित

Scanned with OKEN Scanner

मूल्यमापन चाचणी -१ (PAT -२ )चे गुण शिक्षकांनी कसे नोंदवावेत याच्या सविस्तर मार्गदर्शिकाची लिंक खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

१. संकलित मूल्यमापन चाचणी-१ (PAT -२ )चाटबॉट मार्गदर्शिका लिंक - https://bit.ly/PATUserManual

तसेच राज्यातील शिक्षकांना संकलित मूल्यमापन चाचणी-१ (PAT -२ ) चे गुण PAT (महाराष्ट्र) या चाटबॉटवर नोंदविणेकरिता जिल्ह्यांना दि. ११ नोव्हेंबर २०२४ ते २६ नोव्हेंबर २०२४ पर्यंतचा कालावधी देण्यात येत आहे. करिता गुणनोंद लिंक खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

२. संकलित मूल्यमापन चाचणी-१ (PAT -२ ) गुणांची नोंद करणेसाठी लिंक - https://bit.ly/PAT-MH

उपरोक्त कामकाजासाठी जिल्हा शिक्षणाधिकारी प्राथ./माध्य., शिक्षण निरीक्षक व प्रशासन अधिकारी, म.न.पा./न.पा. यांनी आपल्या कार्यालयातील एका अधिकाऱ्याकडे PAT (महाराष्ट्र) जिल्हा समन्वयक म्हणून जबाबदारी यापूर्वी निश्चित केलेली असेल. त्यानुसार सदर जिल्हा समन्वयक यांनी जिल्ह्यातील सर्व शिक्षकांना विद्या समीक्षा केंद्र (VSK), पुणे यांचेमार्फत PAT (महाराष्ट्र) हा चाटबॉटवर संकलित मूल्यमापन चाचणी-१ (PAT -२ )चे गुण कसे भरावेत याबाबत आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करावे. तसेच ज्या शाळांमध्ये संकलित मूल्यमापन चाचणी-१ (PAT -२) घेण्यात आलेली आहे अशा इयत्ता तिसरी ते नववीच्या शाळामधील विषयनिहाय विद्यार्थ्यांचे गुण चाटबॉटवर नोंदविणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.चाटबॉटच्या बाबतीत तांत्रिक अडचण येणाऱ्या शिक्षकांनी सोबत दिलेल्या गुगल लिंकवर (https://forms.gle/9ssWv4bu5QPCq6XHA) प्रतिसाद नोंदवावा.

तरी आपल्या अधिनस्थ शाळा, मुख्याध्यापक, शिक्षक यांना याबाबतची आवश्यक कार्यवाही करण्याबाबत आपल्या स्तरावरून सूचित करण्यात यावे.

(राहूल रेखावार भा.प्र.से.)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद,महाराष्ट्र, पुणे.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर:-**

१) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३) मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत उचित कार्यवाहीस्तव :**

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. (सर्व).
२. मा. आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
३. प्राचार्य , जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)

Scanned with OKEN Scanner